<u>व्ही.सी.मार्फत</u> <u>सत्र खटला क्र. ४४/२०२१</u>

सरकार -वि- पुष्पा कऱ्हाळे

**निशाणी क्र. ३४**

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. ३ यांची जबानी**

**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

| | | |
|---|---|---|
| माझे नांव | - | अनिकेत भास्करराव अहिरराव |
| वय | - | ४८ वर्षे |
| पदनाम | - | पोलीस निरिक्षक, पोलीस स्टेशन, घाटकोपर. |
| राहणार | - | घाटकोपर. |

<u>सरतपास सहाय्यक सरकारी वकील श्री. एस. पी. हिवाळे यांचे मार्फत -</u>

मी दिनांक १७/०२/२०२१ रोजी मी पोलीस स्टेशन, बुलडाणा शहर येथे सहाय्यक पोलीस निरिक्षक म्हणून कार्यरत होतो. त्या दिवशी महिला पोलीस हेड कॉन्स्टेबल कोकीळा तोमर यांनी फिर्याद नोंदविली. त्या फिर्यादच्या आधारे मी गुन्हा नोंदविला. अपराध क्र. ९३/२०२१ चा तपास मला पोलीस निरिक्षक यांच्या आदेशानुसार मिळाला. तपासादरम्यान, मला फिर्याद व प्रथम खबरी अहवाल प्राप्त झाले. त्यानंतर, फिर्यादीला समाान्य रुग्णालय, बुलडाणा येथे वैद्यकीय तपासणीकरिता पाठविले. आता मला वैद्यकीय मेमो दाखविण्यात आला, हा तोच आहे, त्यावर तत्कालीन ठाणेदार यांची सही आहे, वैद्यकीय मेमोला **<u>निशाणी क्र. ३५</u>** देण्यात येते. दिनांक १८/०२/२०२१ रोजी मी मुख्याधिकारी यांच्या नांवे पंचांना बोलाविण्यासाठी निशाणी क्र. २२ वरील पत्र दिले होते. त्यानंतर, मी पंचांसमक्ष निशाणी क्र. २३ वरील घटनास्थळ पंचनामा तयार केला. त्यानंतर, मी साक्षीदारांचे बयाण नोंदविले. त्यानंतर, दिनांक ०२/०७/२०२१ रोजी मी आरोपीला अटक केली. आता मला अटक पंचनामा दाखविण्यात आला, हा तोच आहे, त्यावर माझी आणि आरोपीची सही आहे, अटक पंचनाम्याला **<u>निशाणी क्र. ३६</u>** देण्यात येते. मी प्रस्तुत प्रकरणात दैनंदिन ड्युटी चार्ज दाखल केला आहे. आता मला ड्युटी चार्ज दाखविण्यात आला, हा तोच आहे, त्यावर साळुंके साहेबांची सही आहे, ती सही मी ओळखतो. यावेळी ड्युटी चार्जला **<u>निशाणी क्र. ३७</u>** देण्यात येते. मी आरोपीला पाहिल्यास ओळखु शकतो. आज रोजी आरोपी न्यायालयात हजर आहे. त्यानंतर, आरोपींविरुध्द सबळ पुरावा मिळून आल्याने वि. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

**सरतपास पुर्ण**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विद्वान वकील श्री. पी. आर. सानप यांच्या मार्फत -</u>**

२. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. २३ वरील घटनास्थळ पंचनामा ज्या पोलीस स्टेशनमध्ये तयार केला ते पोलीस स्टेशन आणि नगर पालिकेजवळील पोलीस स्टेशन यामधील अंतर अंदाजे १ किलोमीटर आहे. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी क्र. २३ वरील घटनास्थळ पंचनामा मी तयार केला नाही आणि त्यासोबत मला कोणतेही कागदपत्र मिळाले नाही. हे म्हणणे खरे नाही की, खोटे दस्तऐवज तयार करुन मी आरोपीविरुध्द खोटी केस केली आहे.

**उलटतपास पुर्ण**

दि. ०५/११/२०२५ समक्ष व श्रवणोत्तर स्विकृत,

स्वा/-

**( आर. के. शर्मा )**

जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश

बुलडाणा